RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–ब

वर्ष ९, अंक ३३(२)] मंगळवार, मार्च १४, २०२३/फाल्गुन २३, शके १९४४ [पृष्ठे ४, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक ८०**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### गृह विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १४ मार्च २०२३.

**आदेश**

**महाराष्ट्र पोलीस अधिनियम.**

क्रमांक पोलीस-११२२/प्र.क्र.२८५/पोल-५अ.— महाराष्ट्र पोलीस अधिनियम (१९५१ चा २२) याच्या कलम ५(ब) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे, महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम, २०११ यात आणखी सुधारणा करण्यासाठी पुढील नियम करीत आहे :—

**१.** या नियमांस, महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) (सुधारणा) नियम, २०२३ असे म्हणावे.

**२.** महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम, २०११ (यात यापुढे ज्याचा निर्देश, “ मुख्य नियम ” असा केला आहे) याच्या नियम ३ मधील, पोट-नियम (एक) च्या खंड (क) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येईल :—

“ (क) शारीरिक पात्रता—

| अनुक्रमांक | शारीरिक पात्रता | महिला | पुरूष | तृतीय पंथी |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| (१) | उंची | १५५ सें.मी. पेक्षा कमी नसावी. | १६५ सें.मी. पेक्षा कमी नसावी | **(अ) स्वतःची लिंग ओळख महिला/तृतीय पंथी अशी केलेल्या व्यक्तीसाठी.—** १५५ सें.मी. पेक्षा कमी नसावी. **(ब) स्वतःची लिंग ओळख पुरूष अशी केलेल्या व्यक्तीसाठी.—** १६५ सें.मी. पेक्षा कमी नसावी. |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| (२) | छाती | आवश्यक नाही | न फुगवता ७९ सें.मी. पेक्षा कमी नसावी व न फुगवलेली छाती व फुगवलेली छाती यातील फरक ५ सें.मी. पेक्षा कमी नसावा. | **स्वतःची लिंग ओळख महिला/पुरूष/तृतीय पंथी अशी केलेल्या व्यक्तीसाठी.—** आवश्यक नाही. |

**टीप.—**तृतीय पंथी व्यक्तीस तिची पुरुष, महिला किंवा तृतीय पंथी अशी स्वतःची लिंग ओळख निश्चित करण्याचा अधिकार आहे.

**३.** मुख्य नियमाच्या नियम ४ मधील, पोट-नियम (एक) ऐवजी, पुढील पोट-नियम दाखल करण्यात येईल :—

" ४. (१) शारीरिक चाचणी (५० गुण).—

जे उमेदवार शारीरिक व शैक्षणिक अर्हता पूर्ण करतात अशा उमेदवारांनी शारीरिक पात्रता चाचणीसाठी उपस्थित राहणे आवश्यक असेल. शारीरिक पात्रता चाचणी पुढीलप्रमाणे एकूण ५० गुणांची असेल :—

**(अ) पुरुष/तृतीय पंथी-स्वतःची लिंग ओळख पुरुष अशी केलेले उमेदवार.**

| | | **गुण** |
|---|---|---|
| (क) | १६०० मीटर धावणे | २० |
| (ख) | १०० मीटर धावणे | १५ |
| (ग) | गोळाफेक | १५ |
| | **एकूण . .** | **५०** |

**(ब) महिला/तृतीय पंथी-स्वतःची लिंग ओळख महिला/तृतीय पंथी अशी केलेले उमेदवार.**

| | | **गुण** |
|---|---|---|
| (क) | ८०० मीटर धावणे | २० |
| (ख) | १०० मीटर धावणे | १५ |
| (ग) | गोळाफेक | १५ |
| | **एकूण . .** | **५०** |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**अ. ए. कुलकर्णी,**
शासनाचे सहसचिव.

## HOME DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mantralaya, Mumbai 400 032, dated the 14th March 2023.

### Order

MAHARASHTRA POLICE ACT.

No. Police-1122/C.R.-285/Pol-5A.— In exercise of the powers conferred by Clause (*b*) of section 5 of the Maharashtra Police Act (XXII of 1951), and of all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra hereby makes the following rules further to amend the Maharashtra Police Constable (Recruitment) Rules, 2011, namely :–-

1. These rules may be called the Maharashtra Police Constables (Recruitment) (Amendment) Rules, 2023.

2. In rule 3 of the Maharashtra Police Constables (Recruitment) Rules, 2011, (hereinafter referred to as " the Principal Rules "), in sub-rule (*1*), for clause (*C*), the following clause shall be subtituted, namely :–

" (C) Physical Qualifications.—

| Sr. No. | Measurement | Female | Male | Transgender |
|---|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) | (5) |
| (*i*) | Height | Shall not be less than 155 centimeters. | Shall not be less than 165 centimeters. | (*a*) *For self-identified gender identity as Female/Third gender.*— Shall not be less than 155 centimeters.<br>(*b*) *For self-identified gender identity as Male.*— Shall not be less than 165 centimeters. |
| (*ii*) | Chest | Not required. | Shall not be less than 79 centimeters deflated and the difference between deflated chest and expanded chest shall not be less than 5 centimeters. | *For self-identified gender identity as Male/Female/ Third gender.*— Not Required. |

*Note.*—Trangender person has right to decide their self-identified gender as male, female or as third gender.

**3.** In rule 4 of the Principal Rules, for sub-rule (*1*), the following sub-rule shall be substituted, namely :—

**" (1) Physical Test (50 marks).—**

The candidates who fulfill the physical and educational qualifications shall be required to appear for physical fitness test. The physical fitness test will be of total 50 marks as follows, namely :—

**(A) Male/Transgender-Self-identified gender identity as Male Candidates.—**

| | | **Marks** |
|---|---|---|
| (a) | 1600 Meters running | 20 |
| (b) | 100 Meters running | 15 |
| (b) | Shot put | 15 |
| | **Total . .** | **50** |

**(B) Female/Transgender-Self-identified gender identity as Female or Third Gender Candidates.**

| | | Marks |
|---|---|---|
| (a) | 800 Meters running | 20 |
| (b) | 100 Meters running | 15 |
| (c) | Shot put | 15 |
| | **Total ..** | **50** |

By order and in the name of the Governor of Maharashtra,

A. E. KULKARNI,
Joint Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.